MHSI07-000641-2022

निशाण क्र. ६३ वरील आदेश

अर्जदार भूषण दिलीप नार्वेकर हे मृद व जलसंधारण उपविभाग, आंबडपाल, ता. कुडाळ, जि. सिंधुदूर्ग येथे उपविभागीय जलसंधारण अधिकारी या पदावर कार्यरत आहे. त्याचे कार्यक्षेत्रात कुडाळ मालवण, सावंतवाडी, वेंगुर्ला दोडामार्ग हे पाच तालूके असून मृदा आणि जलसंधारणाकरीता बंधारे बांधण्याचे काम त्यांच्या खात्याच्या अखत्यारीत येते. त्यांनी पोलिस स्टेशन, आचरा यांनी गुन्हा क्र. १९/२०२२ मध्ये जप्त केलेल्या ८ लोखंडी प्लेट सुपुर्तनाम्यावर मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदार याने असे कथन केले आहे की, त्यांच्या खात्यामार्फत किर्लोस गोठणे नदीच्या बंधाऱ्याचे काम सन २००६ मध्ये झाले होते. सदर बंधाऱ्याजवळ पाणी आडवण्यासाठीच्या लोखंडी प्लेटस ठेवण्यात आलेल्या होत्या. दि. ०३/११/२०२२ रोजी सदर प्लेटची चोरी होत असल्याची माहिती अर्जदार यांना गावचे सरपंच व पोलीस पाटील यांनी दिली. माणसांची चाहूल लागताच चोरटे टेंम्पो आणि प्लेटस टाकून पसार झाले. त्यामुळे अर्जदार यांनी दि. ०५/११/२०२२ रोजी आचरा पोलीस स्टेशन येथे फिर्याद आरोपींविरुध्द दाखल केली होती. पोलीसांनी मृदा व जलसंधारण खात्याच्या मालकीच्या चोरीस गेलेल्या आठ प्लेट जप्त केलेल्या आहेत. सदर प्लेट अभावी त्यांच्या खात्याचे काम खोळंबलेले आहे. सदरच्या प्लेट विनावापर पडून राहिल्या त्यांच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च निर्माण होणारा आहे. तसेच सदर प्लेट गंजून त्या निरोपयोगी होण्याची शक्यता आहे. तसेच झाले तर शासनाचे कधीही भरुन न येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे. अर्जदारने पुढे असे कथन केले आहे की, न्यायालय जे काही अटी शर्तीचे देईल त्याचे पालन करण्यास तो तयार आहे. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली केली आहे.

३. सदर अर्जावर सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविलेला आहे. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी असे कथन केले आहे की, सदरचा मुद्देमाल अर्जदारच्या ताब्यात दिल्यास त्याचा गैरवापर होण्याची शक्यता

आहे. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह नमंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्जदारा तर्फे विद्वान वकिल व सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तर्फे करण्यात आलेले युक्तिवाद ऐकले. अभिलेखाचे काळजीपुर्वक अवलोकन केले. अर्जदाराने त्यांच्या मृद व जल संधारण खात्याच्या मालकीच्या लोखंडी प्लेट मिळण्याची विनंती केली आहे. सदर प्रकरणी अर्जदार हा फिर्यादी असून सदरच्या प्लेट व टेंम्पो पोलीसांनी जप्त केलेला आहे. सदर लोखंडी प्लेट हया पाणी आडविण्यासाठी केला जातो. सदर जप्त मुद्देमालावर फिर्यादी / अर्जदार व्यतिरिक्त अन्य कोणीही आपला हक्क सांगितलेला नाही. जप्त मुद्देमाल हा पोलीस स्टेशनमध्ये राहिल्यास अर्जदार यांचे तसेच शासनाचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत माझ्या मते अर्जदार प्रस्तुत प्रकरणातील जप्त लोखंडी प्लेटचा तात्पुरता ताबा मिळण्यास पात्र आहे.

६. या ठिकाणी, मी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या <u>सुंदरभाई अंबालाल देसाई विरुध्द गुजरात राज्य</u>***, AIR 2003 SC 638*** या प्रकरणात जारी केलेल्या व्यापक मार्गदर्शक तत्वाचा संदर्भ घेवू इच्छितो, म्हणजेच (१) वस्तूचा मालक ती वस्तू वापराविना पडून राहिल्यामुळे किंवा तिचा गैरवापर झाल्यामुळे नुकसान सोसणार नाही (२) न्यायालय किंवा पोलीसांना ती वस्तू सुरक्षित ताब्यात ठेवण्याची आवश्यकता भासणार नाही (३) वस्तूचा ताबा देण्यापुर्वी योग्य पंचनामा तयार केला गेल्यास, खटल्याच्या सुनावणीदरम्यान न्यायालयात ती वस्तू सादर करण्याऐवजी तो पंचनामा पुराव्यासाठी वापरला जावू शकतो, आवश्यकता असल्यास, मालमत्तेचे स्वरुप तपशीलवार वर्णन करुन पुरावा देखील नोंदवला जावू शकतो.

७. म्हणून उपरोक्त प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार हे स्पष्ट आहे की, तपशीलवार पंचनामा आणि छायाचित्रे पुराव्यासाठी वापरली जाऊ शकतात आणि ती वस्तू न्यायालय किंवा पोलीस ठाण्यात ताब्यात ठेवण्याची आवश्यकता नाही. अशा परिस्थितीत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार, सदर लोखंडी प्लेट पोलीस ठाण्यात पडून राहिल्यास कोणताही उद्देश साध्य होणार नाही. शिवाय, अर्जदाराला त्याच्या खात्याअंतर्गत चालू असलेल्या

कामातील पाणी आडविण्यासाठी आवश्यक आहे. सबब, अर्जदार हा मृद व जलसंधारण उपविभाग कुडाळ यांचेककरीता सदर लोखंडी प्लेटचा अंतरिम ताबा मिळणेस पात्र आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. परिणामी मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| आदेश | |
|---|---|
| १. | अर्ज नि.क्र. ६३ मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | तपासिक अंमलदार, आचरा पोलीस ठाणे यांना असे निर्देश देण्यात येतो की, त्यांनी आचरा पोलीस ठाणे गुन्हा क्र. १९/२०२२ मध्ये जप्त केलेल्या आठ प्लेटस हे अर्जदार भूषण दिलीप नार्वेकर उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग, आंबडपाल, ता. कुडाळ, जि. सिंधुदूर्ग यांना, त्यांनी रक्कम रुपये ४०,०००/- चा क्षतीपुर्ती बंधपत्र (indemnity bond) सादर केल्यानंतर खालील अटी शर्तीवर सुपूर्द करावी,<br>(अ) अर्जदाराने सदर ८ लोखंडी प्लेटस न्यायालयाच्या निर्देशानुसार जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा सादर करावी.<br>(ब) अर्जदाराने सदर ८ लोखंडी प्लेटसचा देखावा, रचना, रंग आणि स्वरुप यामध्ये कोणताही बदल करु नये<br>(क) अर्जदाराने सदर ८ लोखंडी प्लेटस खटल्याच्या अंतिम निकालापावेतो कोणत्याही हस्तांतरण पध्दतीव्दारे तिसऱ्या व्यक्तीला हस्तांतरीत करु नये. |
| ३. | तपासिक अंमलदार यांना असे निर्देश देण्यात येतो की, त्यांनी सदर ८ लोखंडी प्लेटसची छायाचित्रे घ्यावीत, त्यावर अर्जदाराची साक्षांकित किंवा प्रतिस्वाक्षरी घेवून त्याचा सविस्तर पंचनामा तयार करावा. तसेच सदरचा पंचनामा या प्रकरणामध्ये हजर करावा. |
| ४. | फोटोचा खर्च अर्जदार याने करावा. |
| ५. | सदर आदेशाची समज त्वरीत तपासिक अंमलदार यांना देण्यात यावी. |
| | (खुल्या न्यायालयात श्रुतलेखन करुन घोषीत करण्यात आले.) |

एम.के.फकीह

दिनांकः ०३/०२/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग -१ मालवण